नि.दि.दा.नं. ६१७/२००५.

**निशाणी क्र.१०१**

**वादीतर्फे साक्षीदार क्र. २.**

मी शपथेवर निवेदन करतो की,

| | | | |
|---|---|---|---|
| माझे नांव | : **सागर श्रीनिवासराव भाग्यवंत** | | |
| माझे वय | : ४९ वर्षे | व्यवसाय | : नोकरी |
| राहणार | : लातुर | तालुका | : लातुर |
| जिल्हा | : लातुर | | |

**सरतपासणी वादीतर्फे विधीज्ञ श्री. सी.एस.कुलकर्णी यांचेकडुन शपथेवर सुरु –**

१. मी उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय कळंब या ठिकाणी नोव्हेंबर २०११ ते जुन २०१५ या कालावधीत निमतानदार या पदावर कार्यरत होतो. सदर कालावधीत कळंब तालुक्यातील नायगाव येथील शेत गट क्र. १७५ क्षेत्र ५३ आर या शेतजमीनी मोजणी करण्यासंदर्भात मला आमच्या कार्यालयाने आदेशीत केले होते. मोजणी करण्या अगोदर मी गट क्र. १७५ चे खातेदारांना कार्यालयाचे दिनांक २१/०३/२०१३ रोजीच्या नोटीसीप्रमाणे मोजणी दिनांक ०३/०४/२०१३ संदर्भात सुचना दिली होती. सदरची नोटीस वादी प्रतिवादी यांना सुध्दा पाठविण्यात आली होती. सदर नोटीस प्रमाणे निश्चित तारखेस मी मोजणीस आवश्यक त्या कागदपत्रासह गेलो होतो. तेथे वादी व प्रतिवादी हे हजर होते. त्यांचे समक्ष मी मला आदेशीत केल्याप्रमाणे मोजणी केली होती. सदर मोजणी आगोदर मी वादी प्रतिवादी यांचे समवेत त्यांचे प्रत्यक्ष ताब्या बाबत चर्चा केली होती. वादी प्रतिवादी यांनी दाखवलेल्या ताब्यानुसार चुन्याची निशाणी करून त्यावर झेंडे उभा करून फलकयंत्राच्या साह्याने मोजणी काम पुर्ण करण्यात आले. त्याबाबतचा पंचनामा मी जायमोक्यावरच तयार केला. आता मला अभिलेखावरील पंचनामा दाखवण्यात आला. त्याची मुळ प्रत मी आज सोबत आणलेली आहे. मुळ प्रतीप्रमाणे अभिलेखावरील पंचनाम्यातील मजकूर हा बरोबर आहे. सदर पंचनाम्यावर माझी स्वतःची, अशोक संभाजी माळी, व्यंकट गणपत शितोळे, बंकट गणपती शितोळे, गोपिचंद संभाजी गोरे, दिलीप चंदू शितोळे इत्यादी उपस्थितांच्या सह्या आहेत. सदर अभिलेखावरील

पंचनाम्याच्या प्रतीस **<u>नि.क्र. १०२</u>** देण्यात येते. त्यानंतर मी माझ्याकडे असलेल्या गट क्र. १७५ संदर्भातील मुळ अभिलेखाची पाहणी केली. मोजणी नकाशा 'अ', 'ब', 'क' प्रतीसह तयार करण्यात आला. त्या संदर्भातील अहवाल वरिष्ठांना सादर केला. आता मला अभिलेखावरील मोजणी नकाशाची 'क' प्रत दाखवण्यात आली. सदर मोजणी नकाशाची 'अ' प्रत मी सोबत आणलेली आहे. सदर 'अ' प्रत व 'क' प्रतीमधील नमुद मजकूर हा तंतोतंत बरोबर आहे. सदर प्रतीवर माझी, कार्यालयीन तपासणी अधिकारी व मुख्यालय सहाय्यक यांच्या सह्या आहेत. त्या मी ओळखतो. सदर अभिलेखावरील 'क' प्रतीस **<u>नि.क्र. १०३</u>** देण्यात येते.

**<u>प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. बी.एन.लोमटे यांचे मार्फत उलट तपासणी सुरु–</u>**

२. गट क्र. १७५ चा जुना सर्व्हे क्र. ४२/४, ४८/४, ५१/४ असा आहे. मोजणीच्या वेळी मी सदर जुना सर्व्हे क्र. ४२/४, ४८/४ व ५१/४ चे नकाशे सोबत आणले होते. सदर मोजणीच्या वेळी मी गट क्र १७५ चे जुने सर्व्हे क्र. ४२/४, ४८/४ व ५१/४ या सर्व्हे क्रमांकाचे पोटहिस्सा संदर्भातील नकाशे सोबत घेतले नव्हते. हे म्हणने खरे नाही की, माझ्या सोबत सदर नकाशे नसल्यामुळे मोक्यावर त्या सर्व्हे नंबरचे पोटहिस्से दर्शविनारी परिस्थिती माझ्या समक्ष नव्हती. हे म्हणने खरे आहे की, सर्व्हे क्रमांकाचा जो मुळ गाव नकाशा मी सोबत घेतला होता त्यात सर्व्हे क्रमांकाचे पोटहिस्से दर्शविण्यात आलेले नाहीत. हे म्हणने खरे आहे की, सदर माझ्या सोबत असलेल्या सर्व्हे क्रमांकाचा जो मुळ नकाशा आहे त्या आधारावरच मी मोजणी केलेली आहे. सदर नकाशाची प्रत मी अभिलेखावर दाखल करण्यास तयार आहे. आमच्या कार्यालयामार्फत मोजणी आगोदर उभयपक्षकारांना जी नोटीस पाठविण्यात आली होती ती मिळाल्याबाबतची पोहच आमच्या कार्यालयीन अभिलेखामध्ये उपलब्ध नाही. सदरची नोटीस मी दिनांक २१/०३/२०१३ रोजी पाठविली होती. सदरच्या नोटीसा आम्ही उभयपक्षकारांना पोष्ट खात्या मार्फत पाठविल्या होत्या. सदर नोटीस ही पोष्टाने पाठविल्याबाबत पोस्टाची पावती आमच्या कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध नाही.

३. गट क्र. १७५ चे बंकट शितोळे, व्यंकट शितोळे, अभिजीत शितोळे, शालन शितोळे, आकाश शितोळे, अविनाश शितोळे व अशोक माळी इत्यादी सहखातेदार आहेत. सद लोकांपैकी मी वादी अशोक माळी, व्यंकट गणपती शितोळे, रंगनाथ शितोळे, साहेबराव शितोळे, उषाबाई बाळासाहेब शितोळे एवढ्याच लोकांना नोटीस दिल्या होत्या. हे म्हणने खरे आहे की, मोजणी करण्या आगोदर उभय पक्षकारांना / लगतचे कास्तकारांना पंधरा दिवसांची आगाउ

नोटीस / सुचना देणे हे आमच्या कार्यालयीन पध्दती प्रमाणे आवश्यक आहे. मोजणी नकाशा नि.क्र. १०३ मध्ये गट क्र. १७५ चा जने सर्व्हे क्रमांक ४२/४, ४८/४ व ५१/४ चे क्षेत्र दर्शविलेले नाही.

प्रश्न – सर्व्हे नं. ४२, ४८ व ५१ या सर्व्हे क्रमांकापैकी गट क्र. १७५ च्या उत्तर बाजुस क्षेत्र आहे.

उत्तर – होय.

४. ते क्षेत्र मी मोजणी नकाशा नि.क्र. १०३ मध्येदर्शविलेले नाही. सदर मोजणी नकाशा नि.क्र. १०३ मधील गट क्र. १७५ चे पुर्व बाजुचे पडीक क्षेत्र हे मोजणीच्या वेळी मी मोजले होते. सदरचे पडीक क्षेत्र हे जवळपास अंदाजे ०.७० चौरस मिटर भरले होते. हे म्हणने खरे आहे की, सदर पडीक क्षेत्र हे सुध्दा वादीच्या मालकीचे होते. मोजणी नकाशा नि.क्र. १०३ मध्ये लाल तुटक रेशेने दर्शविण्यात आलेला रस्ता हा गट क्र. १८०, १९६, १८२ व १९१ मधुन गेलेला आहे. हे म्हणने खरे आहे की, त्याबाबतचा उल्लेख मी निशाणी क्र. १०३ मध्ये केलेला नाही. अशोक माळी, व्यंकट गणपती शितोळे, रंगनाथ शितोळे, साहेबराव शितोळे, उषाबाई बाळासाहेब शितोळे यांचे व्यतिरिक्त इतर कोणत्याही लोकांना मोजणी संदर्भात कार्यालयामार्फत नोटीस देण्यात आली नव्हती. हे म्हणने खरे आहे की, सर्व्हे क्र. ४२, ४८ व ५१ यांचे गट क्र. १७५ व्यतिरीक्त सुध्दा इतर गट पडलेले आहेत. प्रत्येक गट निहाय मी मोजणी केलेली नाही. हे म्हणने खरे नाही की, मोजणी आगोदर मी नियमाप्रमाणे प्रतिवादींना नोटीस दिली नाही. हे म्हणने खरे नाही की, प्रतिवादींच्या गैरहजेरीत सदर मोजणी मी केलेली आहे. हे म्हणने खरे नाही की, नियमाप्रमाणे मोजणी करतेवेळी सर्व्हे क्रमांक ४२, ४८ व ५१ मधील संपूर्ण गटांचे मोजमाप करणे हे आवश्यक होते.

प्रश्न – गट क्र. १७५ मधील खातेधारकांचे प्रत्येकी क्षेत्र आपण मोजणी वेळी स्वतंत्ररित्या मोजले आहे काय ?

उत्तर – आम्हाला केवळ गट क्र. १७५ मधील ५३ आर क्षेत्र मोजणीचा आदेश असल्यामुळे येणे प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नव्हती.

५. हे म्हणने खरे आहे की, मी गट क्र. १७५ मधील इतर सह हिस्सेदारांचे क्षेत्र स्वतंत्रपणे मोजलेले नाही. हे म्हणने खरे आहे की, सदर मोजणी नकाशा हा कार्यालयात आल्यानंतर मी तयार केलेला आहे. हे म्हणने खरे नाही की, वादीच्या सांगण्यानुसार मी मोजणी नकाशा नि.क्र. १०३, पंचनामा व इतर संपूर्ण मोजणीची कार्यवाही केलेली आहे. हे म्हणने खरे

नाही की, मी आज खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

वा.दा.ब.अ.क.के.

---------

साक्षीदाराची सही/अंगठा.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

RAVINDRA PRALHAD BATHE
Digitally signed by RAVINDRA PRALHAD BATHE
Date: 2023.03.15 16:40:49 +0530

दिनांक :- १५/०३/२०२३.

**(आर.पी.बाठे)**

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कळंब.